I J R S S I S, Vol. VIII, Issue (4), Sep.-2022 : 30-33
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांच्या कर्जविषयक स्थितीचे अध्ययन

**[१]सरोज बाबुराव कांबळे*, [२]एस. एन. बुटे,**

[१]संशोधक विद्यार्थीनी, सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर

[२]मार्गदर्शक तथा प्राचार्य, भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय एटापल्ली, जि. गडचिरोली १

*Corresponding Author: sarojkambale@gmail.com, shamraobute405@gmail.com

Communicated : 13.06.2022 Revision : 08.07.2022 Accepted :30.07.2022 Published: 01.09.2022

**सारांश :**

भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्येबाबत असे म्हटल्या जाते की, "भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो व कर्जातच मरतो" या वाक्येवरून भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती किती दयनिय आहे? हे लक्षात येते. पुरातन काळापासून चालत आलेल्या स्पृश्य-अस्पृश्य सारख्या जाचक रूढीप्रथांमुळे अनुसूचित सामाजाची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक उन्नती झालेली नाही. परिणामत: या समाजामध्ये दारिद्र्याचे प्रमाण तुलनेने इतर समाजापेक्षा अधिक आहे. या सामाजिक कारणा सोबतच नैसर्गीक संकटे व पारंपारिक शेती करण्याच्या पध्दतीमुळेही शेती उत्पादनात घट होत जाउन त्यांच्या समोर आर्थिक अडचणी निर्माण होतात. या आर्थिक प्रश्नांचे निराकरण करण्याकरिता 'कर्ज घेणे' हा एकमेव पर्याय शेतकरी बांधवांसमोर उभा राहतो. या शेतकऱ्यांना बी-बीयाने, खते, किटकनाशके, गाय-बैल खरेदी, शेतीची सुधारित अवजारे, सिंचनाच्या सोयी, जमीन सुधारणा आणि कौटुंबीक बाबी इत्यादी गरजांच्या पुर्ततेकरिता कर्जाची आवश्यकता भासते. या गरजांच्या पुर्ततेकरिता शेतकरी सहकारी बँक, राष्ट्रीय बँक, सावकार, नातेवाईक, नाबार्ड आणि बचत गट सारख्या माध्यमाव्दारे कर्ज घेतात.

**बीजसंज्ञा** : शेतकरी, कर्ज, अनुसूचित जाती, शेती व्यवसाय, दारिद्र्य.

**प्रस्तावना :**

“स्वत:कडे पैसे नसल्यामुळे दुसऱ्याकडून उधार घेण्यात आलेले पैसे म्हणजेच कर्ज होय”. कर्जाला मराठी भाषेत 'ऋण' असे संबोधल्या जाते. तसेच कर्ज देणाऱ्याला 'धनको' व कर्ज घेणाऱ्याला 'ऋणको' किंवा 'कर्जदार' असे म्हटल्या जाते. शेती हा एक व्यवसाय आहे. इतर व्यवसायाप्रमाणेच शेती व्यवसायाला देखिल प्रत्ययाची गरज भासतेच. गडचिरोली जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे ७० टक्के लोक शेती व्यवसाय करतात. शेतकरी संख्या व भांडवलाची गरज लक्षात घेता शासनाने अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांकरिता ग्रामीण भागात प्रत्यय पुरवठा उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे.

**संशोधनाचे उद्दीष्ट :**

अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांच्या कर्जविषयक परिस्थितीचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

१) अनुसूचित जातीचे बहुतांश शेतकरी कृषीकर्जाचा वापर शेतीकरिता करतात.
२) शेतीमध्ये कर्ज गुंतवणूक केल्याने शेती उत्पन्नात वाढ होते.

**संशोधन पध्दती :**

सदर अध्ययनाकरिता 'सर्वेक्षन' या संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली.

**संशोधन आराखडा :**

सदर संशोधनाकरिता 'वर्णनात्मक' आराखड्याचा वापर केलेला आहे.

**जनसंख्या :**

गडचिरोली जिल्ह्यातील संपूर्ण अनुसूचित जातीचे शेतकरी हि प्रस्तुत संशोधनातील 'जनसंख्या' आहे.

**न्यादर्श :**

एकूण जनसंख्येपैकी ४६० अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांची निवड 'न्यादर्श' म्हणून करण्यात आली. हि निवड यादृच्छिक पध्दतीने केल्या गेली.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनाकरिता 'प्रश्नावली' व 'मुलाखत' या प्राथमिक स्त्रोतांचा वापर करण्यात आला.

**चर्चात्मक विश्लेषण :**

अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांच्या कर्जविषयक स्थितीचा अभ्यास करताना या शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणारे विविध माध्यमे, शेतीमध्ये होणारी कर्जाची गुंतवणूक आणि या गुंतवणूकीचा शेती उत्पन्नावर होणारा परिणाम या सर्व बाबींचे अध्ययन करणे अनिवार्य ठरते.

**सांख्यिकीय विश्लेषण व अर्थविवेचन :**

सारणी क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, अनुसूचित जातीचे ४२.३९ टक्के शेतकरी सहकारी बँकेतुन कर्ज उचलतात आणि या बँकेतुन कर्ज घेण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्या पाठोपाठ राष्ट्रीय बँकेतून कर्ज घेण्यात येते व त्याचे प्रमाण ३३.६९ टक्के आहे. मात्र सर्वात कमी कर्ज 'इतर' घटकांकडून घेण्यात येते व त्याचे प्रमाण केवळ ४.५६ टक्के आहे.

सारणी क्रं. २ वरून असे निदर्शनास येते की, अनुसूचित जातीचे ६७.१७ टक्के शेतकरी शेतीसाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाचा वापर शेती मध्येच करतात व ३२.८२ टक्के शेतकरी या कर्जाचा उपयोग इतर कार्यासाठी करतात.

सारणी क्रं. ३ वरून असे दिसून येते की, अनुसूचित जातीच्या ५८.९१ टक्के शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात कर्ज गुंतवणूकीमुळे वाढ झालेली आहे. मात्र ४१.०८ टक्के शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात गुंतवणूकीमुळे वाढ झालेली नसल्याचे दिसुन आलेले आहे.

**निष्कर्ष :**

१) संशोधनातील प्राप्त सांख्यिकीय विश्लेषणावरून असे निदर्शनास आले की, अनुसूचित जातीचे जास्तीत-जास्त शेतकरी सहकारी बॅंकेतुन कर्ज घेतात. त्याचप्रमाणे सर्वात कमी कर्ज इतर घटकाव्दारे घेतले जाते.

२) संशोधनातील प्राप्त परिमाणावरून असे लक्षात येते की, अनुसूचित जातीचे बहुतांश शेतकरी कृषी कर्जाचा वापर शेतीमध्येच करतात

३) सदर संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणावरून असे दिसून आले की, शेतीमध्ये कर्जाची गुंतवणूक केल्यामुळे अनुसूचित जातीच्या बहुतांश शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात वाढ झालेली आहे.

**संदर्भसूची :**

बोधनकर, डॉ. सुधीर, अलोणी, प्रा. विवेक, कुळकर्णी, ॲड. मृणाल, “सामाजिक संशोधन पध्दती”, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१८, पृ.क्र.१०८

शास्त्री, डॉ. सुधाकर, “भारतीय अर्थव्यवस्था”, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्टीब्युटर्स, नागपूर, २००६, पृ.क्र.१३६

कऱ्हाडे, डॉ. बी. एम.,”शास्त्रीय संशोधन पध्दती”, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, ३री आवृत्ती, जून २०११, पृ.क्र.१३९

झामरे, जी. एन. “स्थुल अर्थशास्त्र”, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून २००१, पृ.क्र.४०८

**सारणी क्र. १ शेतीकरिता कर्ज कुणाकडून घेतात? हि माहिती दर्शविनारी सारणी.**

| **अ.क्र.** | **घटक/स्त्रोत** | **शेतकरी संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | सहकारी बॅंक | १९५ | ४२.३९ |
| २ | राष्ट्रीय बॅंक | १५५ | ३३.६९ |
| ३ | सावकार | ४८ | १०.४३ |
| ४ | नातेवाईक | ४१ | ८.९१ |
| ५ | इतर | २१ | ४.५६ |
| | एकूण | ४६० | १०० |

स्त्रोत : सर्वेक्षणाची प्राथमिक माहिती

**सारणी क्र. २ कर्जाचा वापर शेतीमध्ये केला काय? हे दर्शविनारी सारणी.**

| **अ.क्र.** | **कर्जाचा वापर शेतीमध्ये केला काय?** | **शेतकरी संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ३०९ | ६७.१७ |
| २ | नाही | १५१ | ३२.८२ |
| | एकूण | ४६० | १०० |

स्त्रोत : सर्वेक्षणाची प्राथमिक माहिती

**सारणी क्र. ३ शेतीमध्ये गुंतवणूक केल्याने उत्पन्नात वाढ झाली काय? हे दर्शविनारी सारणी**

| **अ.क्र.** | **गुंतवणूकीमुळे उत्पन्नात वाढ झाली काय?** | **शेतकरी संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | २७१ | ५८.९१ |
| २ | नाही | १८९ | ४१.०८ |
| | एकूण | ४६० | १०० |

स्त्रोत : सर्वेक्षणाची प्राथमिक माहिती

**आलेख क्र. १**

**कर्ज देणारे घटक व शेतकरी प्रमाण**







